आर.सी.सी क्र.१६७०/२०२३

सरकार विरुध्द मिर अकबर अली

**निशाणी क्र. ३३/ क**

**अभियोग पक्षा तर्फे साक्षीदार क्रमांक ३ यांची जबानी–**

मी प्रतिज्ञापुर्वक शपथेवर निवेदन करते की,

**माझे नाव — शेख बाखर शेख मुबारक,**

वय — ३५ वर्षे, व्यवसाय — खाजगी नोकरी,

निवासस्थान – पढेगाव, अन्सार कॉलनी, औरंगाबाद.

---

**<u>सरतपासणी अभियोग पक्षा करीता</u>**

**<u>श्रीमती. राऊत सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे द्वाराः–</u>**

१. मी आरोपींना ओळखतो. आरोपी क्र.१ हे मी ज्यांच्याकडे काम करत होतो त्यांचे जावई होते. आरोपी क्र.२ हे आरोपी क्र.१ चे वडील आहेत. मी ज्यांच्याकडे काम करत होतो त्यांचे नाव मिर मोहतसिम अली असे आहे. त्यांच्या मुलीचे नाव मीर सखीना असे आहे. मीर सखीना यांचं २७.१०.२०२२ ला झाले. हे लग्न इंम्पेरिअल लॉन्स, कटकट गेट येथे झाले. हे लग्न मीर सखीना यांच्या वडीलांनी लाऊन दिले. हे लग्न व्यवस्थीत करुन दिले. या लग्नात मीर सखीनाच्या वडीलांनी दहेज म्हणुन बारा तेरा लाख रुपये दिले. तसेच त्यांना लग्नाचा खर्च तीस ते पस्तीस लाख रुपये आला. हा खर्च एवढा झाला हे मला माहीती आहे कारण मी त्यांच्याकडे मॅनेजर म्हणुन काम करत असल्यामुळे सर्व झालेल्या खर्चाचा हिशोब मीच ठेवतो. लग्न झाल्यावर मीर सखीना सासरी गेली. सासरी गेल्यानंतर एका आठवडयाने मीर सखीना पुन्हा माहेरी आली. मीर सखीना ही पुन्हा माहेरी आली हे मला जे समजलेले कारण आहे ते तिच्याकडे अजुन रकमेची मागणी करत होते. ते रक्कम रुपये पाच लाख रुपयांची मागणी करत होते व त्यांना काही तरी त्वचा रोगाचा आजार होता त्याच्या उपचाराकरीता ते रक्कम मागत होते. ही रक्कम देणार नाही असे म्हटल्यावर ते लोकं मीर सखीनाचा छळ करु लागले, तिला मारु लागले. माझ्या मालकांनी त्यांना समजावले. त्यांनी असे समजावले की, तुम्ही चांगला उपचार घ्या, त्यानंतर आम्ही मुलीला परत पाठवा. पैशाच्या संदर्भात लग्नापुर्वी आरोपींनी रक्कम

रुपये पाच लाख मागितले त्याप्रामणे त्यांना देण्यात आले हे मला माहीती आहे. मीर सखीनाला पुन्हा सासरी पाठवायला तिचे वडील तयार होते त्यासाठी ते चर्चा करायला मीर सखीनाच्या आईसोबत सासरी गेले. त्यांनी त्यांचं ऐकलं नाही व पैशांची मागणी केली. त्यानंतर मीर सखीनाने खटला दाखल केला. खटला दाखल करण्यापुर्वी दहेज म्हणुन जे दिले होते ते परत मागणी करायला माझे मालक, त्यांचे मित्र मोहम्मद इलियास हे गेले होते परंतु, खुला दिला पण सामान दिले नाही. या प्रकरणी पोलिसांनी माझ्याकडे चौकशी केली होती. मी दोन्ही आरोपींना ओळखतो. आज दोघेही न्यायालयात हजर आहेत.

सरतपास संपला.

**उलटतपास आरोपींतर्फे मा. विधीज्ञ श्री. खान.**

२. मी आज साक्षीला आलो तो खटला ४९८–अ चा आहे. ४९८–अ चा खटला हा त्रास दिलेला असतो त्यासाठी असतो. तसेच रक्कम मागितलेली असेल त्यासाठी आहे. मी माझ्या मालकांकडे पंधरा–सोळा वर्ष काम करत होतो. आमच्या सोबत एक शफीक खान नावाचा इसम पण कामाला होता. सखीनाच्या सासरच्यांनी तिला त्रास दिला हे मला सखीनाने सांगितले नाही, माझ्या मालकाने सांगितले. जो काही खर्च झाला, सामान दिले, लग्न कसं झाले, त्याबद्दल मी जे काही सांगितले ते मला सर्व माझ्या मालकांनी सांगितले, त्याबददल मला सखीनाने काही सांगितले नाही. मी आणि इलियास आरोपींच्या घरी गेलो होतो ते त्यांना समजावायला गेलो होतो आम्ही त्यांना समजावले की, जे काही सामान आहे ते परत दयावे व सर्व संपुन टाका. मी इलियासच्या मोबाईल फोन वर माझ्या मालकांबरोबर आरोपींचे संभाषण करुन दिले. त्यांनी फोनवर असे समजावले की, दहेज परत दया, व्यवस्थीत रहा. व्यवस्थीत रहा याचा अर्थ व्यवस्थीत नात्यात रहा. मी आरोपी क्र.१ च्या आजार पाहीले नाही. हे म्हणणे खरे आहे की, जे मला मालकांनी सांगितले त्यावर मी विश्वास ठेवला. हे मला माहीती नाही की, जेव्हा फोनवर चर्चा चालली होती तेव्हा त्यांचे काही भांडण नव्हते. आरोपी क्र.२ सखीनाचे सासरे हे त्यावेळेला चाललेल्या फोनवरचे संभाषण रेकॉर्ड करत होते याबद्दल मला माहीती नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळेला मी जे काही संभाषण चालले होते त्यांचं रेकॉर्ड नष्ट

केला. माझी आरोपींसोबत त्यानंतर कधी भेट झाली नाही. मला माझ्या मालकांच्या शिवाय अन्य कोणीही सखीनाला त्रास देत असल्याचे सांगितले नाही. मला माझ्या मालकांच्या पत्नीने सुध्दा सखीनाला त्रास देत असल्याचे सांगितले नाही. जो काही खर्च झाल्याचं मी सांगितलं तो सर्व मालक फक्त मलाच सांगायचे. रक्कम रुपये पाच लाख लग्नापुर्वी माझ्या समोर मागितले नाही पण मीच रक्कम रुपये पाच लाख हॉस्पीटलमध्ये जाऊन दिले.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

| समक्ष | श्रवणोत्तर स्वीकृती. |
| --- | --- |
| स्वाक्षरीत/– | स्वाक्षरीत/– |
| ( श्री. आर. एस. जांबोटकर ) | ( श्री. आर. एस. जांबोटकर ) |
| मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद | मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद |